follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 ❋ वर्ष २५ ❋ अंक ३३० ❋ सातारा ❋ शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४ पाने ४ ❋ किंमत ५/- रूपये

# गुजरातमध्ये पुराचे थैमान





## २६ जणांचा मृत्यू तर १८,००० जणांना सुरक्षित स्थळी हलविले

**अहमदाबाद :** गुजरातमध्ये काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून राज्याच्या अनेक भागात पूर आला आहे. बडौद्याला पूराचा सर्वाधिक फटका बसला असून शहरातील काही भागात १० ते १२ फुटापर्यंत पाणी साचले आहे. मागच्या तीन दिवसांत पाऊस आणि पूरामुळे २६ जणांचे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर पूरग्रस्त भागातून १८ हजार लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. यानंतर गुरूवारी हवामान विभागाने १० जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट तर २२ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

गुजरात सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मोरबी, बडौदा, भरूच, जामनगर, अरवली, पंचमहल, द्वारका आणि दांग या जिल्ह्यात प्रत्येकी एका नागरिकाचा मृत्यू झाला. तर आनंद जिल्ह्यात सहा, अहमदाबादमध्ये चार आणि गांधीनगर, खेडा, महीसागर, दाहोड आणि सुरेंद्रनगरमध्ये प्रत्येकी दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

पूरातून वाचण्यासाठी अनेक भागात लोकांनी घराच्या छतावर आसरा घेतला आहे. बडौदामधील हजारो नागरिकांना एनडीआरएफच्या पथकाकडून सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. तसेच एसडीआरएफचेही अनेक पथके ठिकठिकाणी बचाव कार्य करत आहेत.

**पंतप्रधान मोदींकडून मुख्यमंर्त्यांना फोन**

गुजरातच्या काही भागात अन्यधान्याची टंचाई भासत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याशी फोनवरून संवाद साधत राज्यातील अन्यधान्याच्या साठ्याबाबत माहिती घेतली. तसेच या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी केंद्र सरकार पूर्ण ताकदीनिशी गुजरातच्या पाठीशी आहे, असेही पंतप्रधानांनी आश्वास दिले.

मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी एनडीआरएफचे आणखी पाच पथक बचाव कार्यासाठी तैनात केले आहेत. तसेच लष्कराचीही मदत घेतली जात आहे. बडौदामध्ये बचावकार्य आणि मदतकार्य मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. ज्याठिकाणी पूराचा सर्वाधिक फटका बसला आहे, त्याठिकाणी लष्काराच्या सहा तुकड्या बचाव कार्यात गुंतल्या आहेत.



**धरणे, नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली**

गुजरात सरकारच्या अधिकृत माहितीनुसार, राज्यातील १४० जलाशय पूर्ण भरली असून २४ नद्या दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे आसपासच्या परिसराला धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. पूराचे पाणी साचल्यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून अनेक ठिकाणी वाहतूक खंडीत झाली आहे. राज्यातील २०६ धरणांपैकी १२२ धरणांच्या परिसराला हाय अलर्ट देण्यात आला आहे.

## अफगाणिस्तानमध्ये ५.७ रिश्टर स्लेक तीव्रतेचा भूकंप



नवी दिल्ली : आज सकाळी अफगाणिस्तानमध्ये भूकंपाचा मोठा धक्का बसला आहे. या भूकंपाची तीव्रता ५.७ रिश्टर स्लेक इतकी नोंदवण्यात आली आहे. या भूकंपाचा प्रभाव राजधानी दिल्ली आणि आजुबाजुच्या परिसरातही जाणवला आहे. महत्त्वाचे म्हणजे या भूकंपात अद्यापपर्यंत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. आज सकाळी ११.२६ मिनिटांनी या भूकंपाची नोंद झाली आहे.महत्त्वाचे म्हणजे दोन आठवड्यांपूर्वीसुद्धा अशाच प्रकारे भूकंपाची घटना घडली होती. त्या भूकंपाची तीव्रताही ४.८ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली होती. सुदैवाने त्या घटनेतही कोणतीही जीवितहानी झालेली नव्हती.

अफगाणिस्तान हा भूकंपासाठी अतिशय संवेदनशील मानला मानला जातो. गेल्या काही वर्षात अफगाणिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात भूकंपाच्या घटना घडल्या आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, या घटनांमध्ये चार हजार पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर नऊ हजार नागरिक जखमी झाले आहेत. या घटनांमध्ये १२ हजारांपेक्षा जास्त घरांचे नुकसान झालं आहे. या भूकंपाची तीव्रता, ५ ते ६.६ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली आहे.

२०२३ च्या ऑक्टोबर महिन्यात अफगाणिस्तानमध्ये चार दिवसांत चार भूकंपाच्या घटना घडल्या होत्या. हेरात प्रांतात आलेल्या भूकपात २,५०० हून अधिक लोकांचा बळी गेला होता. तर हजारो नागरिक जखमी झाले होते. या भूकंपाच्या घटनेत अनेक गावं भुईसपाट झाली होती. शेकडो नागरिक मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. तसेच शेकडो घरं जमीनदोस्त झाली होती. गेल्या दोन दशकांत अफगाणिस्तानमध्ये झालेले हे सर्वात मोठे भूकंप होते. त्यापूर्वी जून २०२२ मध्ये पूर्व अफगाणिस्तानात आलेल्या भूकंपात १,००० हून अधिक लोकांचा बळी गेला होता.

## भात खरेदी बोनस पासून शेतकरी वंचित

**मुंबई :** शेतकरी वर्ग रब्बी व खरीप हंगामात आपल्या हक्काच्या भात पिकाचे पैसे मिळतील या आशेवर बसलेले असताना शेतकरी संघाचे अधिकारी भात खरेदी नोंदी योग्य प्रकारे करत नसल्याने अनेक शेतकऱ्यांचे भात खरेदी बोनस चे पैसे मिळाले नाहीत.

या अन्यायाविरोधात लोकमित्र रमेश हिंदुराव यांनी आझाद मैदानात आंदोलन सुरू केले आहे. आधारभूत किंमत धान खरेदी योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२०-२१ मधील मुरबाड तालुक्यातील ५७८ शेतकऱ्यांचे ८० लाख रुपये मिळणे बाकी आहे. ऑनलाईन कारभार म्हणजे आंधळ दळतंय अन् कुत्रे पीठ खातंय असा आहे. अधिकाऱ्यांनी खरीप हंगामात भात खरेदी केला व रब्बी हंगामाची नोंद केल्याने या शेतकऱ्यावर अन्यात झाला आहे. अशी माहिती यावेळी रमेश हिंदुराव यांनी दिली. संगणक कारभार सुधारला तर वीज नसणे, वीज आली तर अधिकारी नसणे, अधिकारी असले की सरकारी पत्रव्यवहार अपुरा असणे, अनेक तांत्रिक त्रुटी व लाल फित कारभार यामुळे आम्ही शेतकरी आमच्याच हक्काच्या शेत मालाच्या पैशापासून वंचित आहोत. त्यामुळे सरकारने आमच्या मागण्या मान्य करून न्याय द्यावा अशी मागणी शेतकरी करत आहेत.



## ठाण्याच्या 'हिरकणी'ने १० व्या वर्षी सर केले रशियातील बाझार्डुझू शिखर

**ठाणे :** रशियाच्या सीमेवर वसलेले अझरबैजान मधील सर्वात उंच पर्वत बाझार्डुझू आहे. ठाण्याची रहिवासी महाराष्ट्राची हिरकणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या १० वर्षीय ग्रिहिथा सचिन विचारे हिने २६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.२० वाजता बाझार्डुझू शिखर यशस्वीरित्या सर केले आणि शिखरावर भारतीय ध्वज फडकवला.

**बाझार्डुझू सर करत रचला इतिहास :** रशिया आणि अझरबैजान सीमा सुरक्षा दलांकडून मोहिमेची परवानगी मिळाल्यानंतर ग्रिहिथानं २४ ऑगस्ट रोजी तिच्या वडिलांसह, अझरबैजान मधील EXpedition टीम आणि भारताच्या ऋभ्रू हळसह एदशिवळींळेपी टीमसह चढाई सुरु केली आणि २६ ऑगस्ट रोजी ही मोहीम यशस्वी केली. हा शिखरा सर करुन ग्रिहिथानं केवळ तिची अतुलनीय दृढनिश्चय आणि कौशल्य दाखवलं नाही तर माउंट बाजारदुझू हे आव्हानात्मक शिखर जिंकणारी सर्वात कमी वयाची भारतीय बनण्याचा इतिहासही रचला आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त ३ सप्टेंबर रोजी ग्रंथाचे प्रकाशन

**मुंबई :** महाराष्ट्र विधानमंडळातील राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे दिल्या जाणाऱ्या विधानपरिषद आणि विधानसभा अशा दोन्ही सभागृहांतील सन २०१९ ते २०२४ या कालावधीतील 'उत्कृष्ट संसदपटू' आणि 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कारप्राप्त सदस्यांना मंगळवार, ३ सप्टेंबर, २०२४ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे. विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त होणाऱ्या या विशेष समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. यावेळी 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' या ग्रंथाचे प्रकाशन देखील करण्यात येणार आहे, अशी माहिती विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिली.



राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा ही देशातील राज्य विधानमंडळांमध्ये स्थापन झालेली (सन १९५२) सर्वात पहिली शाखा आहे. संसदीय लोकशाहीच्या संदर्भात सदस्यांसाठी विविध प्रबोधनात्मक आणि प्रशिक्षणात्मक उपक्रम राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सातत्याने राबविण्यात येतात. सन १९९५ पासून दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना प्रत्येक वर्षासाठी ''उत्कृष्ट संसदपटू'' आणि ''उत्कृष्ट भाषण'' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन पुरस्कारप्राप्त सदस्यांना दि. ३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या समारंभात गौरविण्यात येईल.

या समारंभास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि विजय वडेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती असेल.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या गौरवशाली परंपरेतील या संस्मरणीय आणि ऐतिहासिक सोहळ्यासाठी दोन्ही सभागृहांचे विद्यमान सदस्य, विधानपरिषदेचे माजी सदस्य आणि महाराष्ट्रातील संसद सदस्य यांना निमंत्रित करण्यात आले असून सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही पीठासीन अधिकारी यांनी केले.





## .वाहतूक शाखेच्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांकडून पोलीस महिलेचाच फोटो ..

**इतर वेळी नो पार्किंग किंवा नो एंट्रीतून वाहन दामटले की वाहन चालकावर कारवाई केली जाते .त्यासाठी आता दम किंवा दटवणी न करता संबंधित वाहनाचा नंबर प्लेटचा फोटो काढून त्यांच्यावर दंडाची आकारणी केली जाते .सातारा शहरातील मोती चौकात या वाहतूक शाखेच्या महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या पोलीस मैत्रिणीचा काढलेला फोटो दंडासाठी की असाच इतर पाठवण्यासाठी असाच प्रश्न हे दृश्य पाहिल्यावर मनात येत आहे.( फोटो ..अतुल देशपांडे सातारा)**

## महाराष्ट्रातील विकास प्रकल्पांसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे पाठबळ



**मुंबई :** राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीचे प्रकल्प सुरू आहेत. मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांसाठी केंद्र सरकार, जागतिक बँक, आशियाई डेव्हलपमेंट बँक आदी मार्फत निधी उभारणी केली जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे महाराष्ट्रातील विकास प्रकल्पांसाठी पाठबळ असून एमएमआर प्रदेश एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठेल अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

हॉटेल ताज प्रेसिडेंट येथे आयोजित पुढारी न्युज पहिला वर्धापन दिन निमित्त 'महाराष्ट्राचा विकास व भविष्यातील महाराष्ट्राची वाटचाल' या विषयावर प्रसन्न जोशी यांनी घेतलेल्या मुलाखत प्रसंगी ते बोलत होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी बोलताना महाराष्ट्राच्या विकासाचा पट उघडून दाखविला. विकास कामांमुळे गुजरात व कर्नाटक पेक्षा महाराष्ट्र देशात सर्वात जास्त परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात यशस्वी ठरला आहे. मेट्रो लाईन–३ प्रकल्प सप्टेंबर मध्ये जनतेसाठी खुला केला जाईल. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे मिसिंग लिंक, रेल्वेचे पायाभूत सुविधा व वाहतूक प्रकल्प, बुलेट ट्रेन, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारी रस्ता – कोस्टल रोड या प्रकल्पांचा त्यांनी यावेळी उल्लेख केला.

मुख्यमंत्री म्हणाले, मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) एक ट्रिलियन डॉलर्सचे उद्दिष्ट गाठू शकतो असे नीती आयोगाने म्हटले आहे. या दृष्टीने लॉजिस्टिक्स पार्क, वाढवण, दिघी, औद्योगीक हाय-ग्रोथ इंडस्ट्रीयल हब, विकासीत करण्यात येत आहे. नागरी विकासाच्या व उत्पादन प्रकल्पांमुळे मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत विकासाला दिलेले प्राधान्य महत्त्वाचे आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित विविध प्रश्न तसेच युवक, महिला, शेतकरी, विद्यार्थी यांच्याबाबत राज्य सरकारच्या धोरणांच्या अनुषंगाने विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली.

शेतकऱ्यांसाठी विविध योजनांतून व विकास कामातून ४५ हजार कोटी रुपये खर्च केले असून मुलींना उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय ,अभियांत्रिकी सारख्या अभ्यासक्रमांना शंभर टक्के फी सवलत दिली आहे.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेबाबत मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, यामुळे अनेक भगिनींना हक्काच्या आधारासह आर्थिक बळ मिळाले आहे. रक्षाबंधनपूर्वी बँक खात्यात आलेल्या रकमेतून आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी त्याचा त्यांना उपयोग होणार आहे. भविष्यात ही रक्कम ३००० पर्यत वाढविण्यात येईल. असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

बदलापूर येथील घटनेच्या अनुषंगाने कठोर शिक्षा व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री श्री.शिंदे यांचे पुढारी मीडिया हाऊस तर्फे पद्मश्री प्रतापराव जाधव यांनी 'वेध महाराष्ट्राचा'हे कॉफी टेबल बुक व पुढारी न्युज च्या 'गोल्डन बूम' चे सन्मानचिन्हे देऊन स्वागत व सत्कार केला. याप्रसंगी शिक्षण मंत्री दीपक केसरकर, महिला व बालविकास मंत्री कु. अदिती तटकरे, समूह संपादक योगेश जाधव, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## स्थित्यंतर

राही भिडे
९८६७५२१०४९



# निर्भया' ते 'अभया' विकृती तीच.

स्त्रीशक्तीचा सर्व क्षेत्रांमध्ये संचार झालेला असताना स्त्रियांवरील वाढते अन्याय, अत्याचार, खून, बलात्कार थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत, कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक छळ, याबरोबरच लहानग्या चिमुरड्या मुलींवर अत्याचार करणाऱ्या विकृतीही फोफावल्या आहेत. बाप, भावासारख्या रक्ताच्या पवित्र नात्यांची ओळख राहिली नाही अशा गलिच्छ घटना समोर येत आहेत. बदलापूरला एका शाळेच्या शिपायाने दोन लहानग्या चिमुरड्यांवर जे अत्याचार केले त्याचे वृत्त येताच सर्वत्र संतापाची लाट पसरली. पालकांना आपल्या मुलीच्या सुरक्षिततेविषयी चिंता वाटायला लागली, त्यातून संतापाचा उद्रेक झाला आणि लोक प्रचंड संख्येने आंदोलनासाठी बाहेर पडले. संतापाच्या भरात लोकांनी रेल्वेरुळांवर उतरून रेलरोको केला. या आधी एखाद- दुसऱ्या निषेधाच्या मोर्चाव्यतिरिक्त फारशी तीव्र प्रतिक्रियाकधी उमटली नव्हती. नवी दिल्लीत १२ वर्षांपूर्वी झालेले निर्भया प्रकरण, कोलकाताचे अभया प्रकरण, हाथरस, उल्हासनगर, पुणे, मुंबई, नवी मुंबई, नागपूर अकोला, बदलापूर अशा कितीतरी दररोज घडणाऱ्या मन विषण्ण करणाऱ्या बलात्काराच्या घटना पाहिल्या, तर एका तपात देशात बरेच बदल झाले. सरकार बदलले, कायदे बदलले, तंत्रज्ञान बदलले, प्रत्येक गाव ग्लोबल झाले, टीव्ही, मोबाईल, कम्प्युटर खेडोपाडी पोहोचले. लहान मुलं तासन्तास मोबाईलमध्ये डोके घालून बसू लागली, असे असले तरी एक गोष्ट बदलली नाही, ती म्हणजे देशातील मुलींवर आणि स्त्रियांवर होत असलेले अत्याचार.... पुरुषप्रधान भारतीय समाजाची विचारसरणी तीच बुरसटलेली असल्याने 'देश बदल रहा है, अत्याचार बढ़ रहे है' अशी स्थिती आहे.

कोलकात्ताच्या घटनेनंतर बदलापूरच्या घटनेने महाराष्ट्र हादरला. त्याअगोदर जयश्री शिंदेच्या खूनप्रकरणाने नवी मुंबईत मोर्चा निघाला. छत्रपती संभाजीनगरमध्ये लोक रस्त्यावर आले. अलीकडच्या काळातील घटना तर पुरोगामी महाराष्ट्राने मान खाली घालावी अशी आहे. निर्भयाच्या दोषींना आठ वर्षांनंतर फाशीची शिक्षा झाली. या शिक्षेनंतर अशी घटना देशात पुन्हा होणार नाही, असा विश्वास होता; पण घटना रोज घडत असतात. फरक एवढाच असतो की काही घटना अधिक भीषण असतात. त्यामुळे वर्षानुवर्षे झोपलेला देश पुन्हा एकदा जागा होतो. काही दिवस माध्यमांत आणि समाजाच्या जाणिवेत हा मुद्दा तापत राहतो. त्यातही कोलकात्याच्या डॉक्टर महिलेवरील घटनेनंतर भाजप मोर्चे काढतो, तर बदलापूरच्या घटनेनंतर शिवसेनेच्या शिंदे गटाचा नेताच महिला पत्रकार मोहिनी जाधववर प्रकरण समोर आणल्याबद्दल आगपाखड करतो. तुझ्यावर बलात्कार झाल्यासारखी काय बातम्या देत होतीस,' अशी विचारणा निर्लज्जपणे करतो. या प्रकरणाला राजकीय वळण लावण्याचा प्रकार घडला हे दुर्दैवी आहे. या कार्यकर्त्याने महिला पत्रकार मोहिनी जाधव यांच्याबद्दल दर्शविलेल्या असंवेदनशीलतेबद्दल त्याचा पत्रकार संघटनांनी निषेध केला आहे. बदलापूरच्या ज्या शाळेत चिमुरड्यांवर लैंगिक अत्याचार झाले, ती शाळा संस्काराचा जप करणाऱ्यांची आहे. त्या शाळेने हा प्रकार दडपण्याचा प्रयत्न केला, ही गंभीर बाब उच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यातून उघड झाली. निर्भया प्रकरणानंतर बलात्काराविरोधातील कायदे कडक झाले असतानाही असे गुन्हे करण्यापूर्वी गुन्हेगारांच्या मनात भीती का निर्माण होत नाही, असा प्रश्न पडतो. दिल्ली, हैदराबाद, कोलकत्ता, जळगाव, अजमेरसारख्या एक ना अनेक घटनांत क्रूरता दिसून येते. याचे कारण कायदा बदलण्याइतके किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाचे आहे, ते समाजाची विचारसरणी बदलणे. काही सन्माननीय अपवाद वगळता समाजात महिलांना दुय्यम समजले जात असून नेहमीच तुच्छतेने पाहिले जाते. स्त्री ही सूड, बदला घेण्यासाठी आणि उपभोगासाठीच आहे, या भावनेतून तिच्यावर अत्याचार होत असतात. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो (एनसीआरबी) च्या आकडेवारीनुसार २०१२ मध्ये २,४४,२७० गुन्हे नोंदवण्यात आले होते, त्यापैकी २४,९२३ बलात्काराचे होते. याघटनेच्या दशकानंतरही अशा घटनाक्रमी होण्याऐवजी झपाट्याने वाढल्या आहेत. 'एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये ४,४५,२५६ गुन्हे नोंदवले गेले. त्यापैकी ३१,५१६ बलात्काराच्या घटना घडल्या. 'निर्भया' प्रकरणात आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात आली होती. त्यालाही एक दशक लागले. आश्चर्य म्हणजे अजमेरच्या प्रकरणात दर शंभराहून अधिक मुलींवर लैंगिक अत्याचार

केलेल्यांना ३२ वर्षानंतर शिक्षा झाली. अशी अनेक प्रकरणे आहेत, ज्यात दोषींना शिक्षा झाली नाही. त्यामुळे पोलीस आणि कायदा या दोहोंची भीती उरलेली नाही. लहानपणापासून मुला-मुलींत समानतेचे संस्कार रुजवायला हवेत. मुलांच्या मनात मुलींविषयी आदराची भावना निर्माण करणे कायद्यापेक्षा अधिक प्रभावी ठरेल. यामध्ये कुटुंब आणि समाज हेच महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. खरे तर चित्रपट नाटके दूरदर्शनवरील असंख्य वाहिन्या या दृक्श्राव्य माध्यमांचा समाजावर प्रभाव पडत असतो. वाढत्या वयात, विशेषतः पौगंडावस्थेत कुटुंबाव्यतिरिक्त मित्रांचाही मोठा प्रभाव असतो. पाचवी- सहावीपर्यंत मुले आईवडिलांना विचारूनच सर्व काही करतात. त्यानंतर तो स्वतःचे मित्र आणि गट बनवतो. अशा वेळी आपण त्यांच्याशी बोलून त्याला पालक म्हणून नव्हे, तर एक मित्र म्हणून समजावून सांगितले तर परिस्थितीत फरक होईल. पालकांनी त्याच्याशी प्रेमाने बोलून त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करावा. शाळांमध्ये लैंगिक शिक्षण दिले पाहिजे. ते देण्याची पद्धत योग्य असली पाहिजे.

बलात्कार ही भारतात नवीन गोष्ट नाही, ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे, जी नेहमीच चर्चेत असते. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो' च्या अहवालानुसार, २०२२ मध्ये भारतात दररोज ८६ बलात्काराच्या घटना नोंदवण्यात आल्या, याचा अर्थ दर १६ मिनिटांनी एक बलात्काराचा गुन्हा नोंदवला गेला. दर तीन दिवसांनी दोन महिलांवर बलात्कार करून त्यांची हत्या करण्यात आली. राज्यनिहाय बलात्काराची आकडेवारी पाहिली, तर २०२२ मध्ये राजस्थानमध्ये सर्वाधिक ५४०८ बलात्कारासारखे गंभीर गुन्हे घडले. राजस्थाननंतर उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश ही दोन राज्ये आहेत, जिथे तीन हजार महिलांवर असे गुन्हे घडले आहेत. याशिवाय महाराष्ट्र (२९११), हरियाणा (१७८७), आसाम (१४७८), ओडिशा (१४६४), झारखंड (१२९८), छत्तीसगड (१२४६), पश्चिम बंगाल (१११२) मध्ये महिलांवरील बलात्काराची सर्वाधिक प्रकरणे नोंदवली गेली आहेत. बलात्काराच्या बाबतीत उत्तराखंड मध्ये सर्वाधिक १५.४ गुन्हे नोंदवले जातात. उत्तराखंडनंतर चंदीगड (१३.९), राजस्थान (१३.८), हरियाणा (१२.७), दिल्ली (१२.३), लक्षद्वीप (१२.१३ या

राज्यांमध्ये बलात्काराच्या गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. २०२२ च्या 'एनसीआरबी'च्या अहवालानुसार, १८ ते ३० वयोगटातील स्त्रिया लैंगिक छळाच्या सर्वाधिक बळी (२१,०६३) होत्या. याशिवाय ३० ते ४५ वयोगटातील ८६४४ महिलांवर बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. एकूण ३१, ५१६ बलात्कार प्रकरणांपैकी ९६.६ टक्के (३०,४५४ ) प्रकरणे अशी आहेत, ज्यात आरोपी कोणीतरी ओळखीचा आहे किंवा पीडित महिलांचा नातेवाईक आहे. या आरोपींमध्ये पीडितेच्या कुटुंबातील सदस्य, मित्र/ ऑनलाइन मित्र किंवा लिव्ह-इन पार्टनर, कौटुंबिक मित्र, शेजारी, बॉस किंवा इतर कोणत्याही ओळखीच्या व्यक्तीचा समावेश आहे. केवळ १०६२ प्रकरणे आहेत ज्यात आरोपी अज्ञात व्यक्ती आहे. सर्वाधिक १४,५८२ प्रकरणांमध्ये, पीडित महिलांचा मित्र, लिव्ह-इन पार्टनर किंवा परक्या पतीविरुद्ध बलात्काराची प्रकरणे नोंदवली गेली. याशिवाय, १३,५४८ प्रकरणांमध्ये हा गुन्हा कुटुंबातील मित्र, बॉ किंवा इतर ओळखीच्या व्यक्तीने केला आहे. २३२४ प्रकरणांमध्ये पीडितेच्या कुटुंबीयांवरच बलात्काराचा आरोप आहे. २०२२ मध्ये बलात्काराच्या एकूण गुन्ह्यांपैकी १९,९५४ गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले.

५०७ प्रकरणांमध्ये न्यायालयाने दोषी ठरवले. न्यायालयाने एकूण १३८८ खटले निकाली काढले आणि एकूण १२,०६२ प्रकरणांमध्ये आरोपींची निर्दोषः मुक्तता करण्यात आली. अहवालानुसार, २७.४ टक्के प्रकरणांमध्ये न्यायालयाने बलात्काराच्या आरोपींना दोषी ठरवले आहे. 'एनसीआरबी' डेटा दर्शविते, की २०२२ मध्ये, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या १५ महिलांवर दररोज बलात्कार झाले. एकूण ५५८८ गुन्हे दाखल झाले असून ५६१० महिलांनी ही घटना नोंदवली आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या महिलांची संख्या जास्त असून त्यांच्या गुन्ह्याचे प्रमाणही जास्त आहे. २०२२ मध्ये, अनुसूचित जातीच्या ४२५२ महिलांनी ४२४१ खटले दाखल केले, अनुसूचित जमातीच्या (एसटी) १३५८ महिलांनी या घटनेची फिर्याद दिली. एकूण १३४७ प्रकरणे नोंदवण्यात आली. याचा अर्थ दुर्बल घटक आणि महिला यांच्यावरील अत्याचार वाढत आहेत.

# मालवणमधील पुतळा उभारण्यासाठी किती कोटी खर्च झाले?

## रोहित पवारांनी कार्यक्रमाच्या खर्चाची दिली माहिती

**मुंबई** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण समुद्रकिनारी राजकोट किल्ल्यावर ४ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नौदल दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. मात्र हा पुतळा कोसळल्यामुळे आता राज्यात राजकारण तापले आहे. हा पुतळा उभारताना मोठा भ्रष्टाचार झाला असा आरोप विरोधकांनी केला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अनावरण करण्याच्या कार्यक्रमात किती खर्च झाला? याची मिळवून ती जाहिर केली आहे.

रोहित पवार यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर ४ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या खर्चाचा काही तपशील उघड केला आहे. यामध्ये ते म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा २.४० कोटींचा आणि पुतळा अनावरण कार्यक्रमाला येणाऱ्या पाहुण्यांसाठी तात्पुरते हेलिपॅड उभारण्यात २.०२ कोटी खर्च करण्यात आले. वारेएए व्वाएए सरकार! घरापेक्षा दरवाजे-खिडक्या महाग असाच या सरकारचा दळभद्री कार्यक्रम म्हणावा लागेल.''

पंतप्रधान मोदी सिंधुदुर्गच्या दौऱ्यावर येणार असल्यामुळे तीन हेलिपॅड उभारण्यात आले. त्यासाठी ७८ लाख, ४४ लाख अणि ७९ लाख प्रत्येकी हेलिपॅडवर खर्च करण्यात आले, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे.'

# अजित पवार यांना मराठवाड्यात विरोध

## मराठा, मुस्लीम समाजांच्या नाराजीचा फटका

**छत्रपती संभाजीनगर** : लोकसभा निवडणुकीपूर्वी ' मराठा आरक्षणा' च्या मागणीसाठी सत्ताधारी नेत्यांची होणारी अडवणूक अजूनही कायम असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर ' एक मराठा लाख मराठा' अशा घोषणा देण्यात आल्या. त्याच वेळी मुस्लिम समाजातील तरुणांनी रामगिरी महाराजांना अटक करा, या मागणीसाठी त्यांच्या वाहनाचा ताफा अडवला. या दोन्ही घटना अजित पवार गटाचे आमदार राजू नवघरे व बाबासाहेब पाटील यांच्या वसमत आणि अहमदपूर मतदारसंघात घडल्या हे विशेष.

लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात अडकून पडलेले अजित पवार आता मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. पुतळा प्रकरण तापत असल्याचे लक्षात आल्यानंतर ते माफी मागून मोकळे झाले. बहुतांश सत्ताधारी नेत्यांची मदार आता 'लाडकी बहीण' योजनेवर अवलंबून असल्याने अजित पवारही आपल्या प्रचारात ही योजना निवडणुकीनंतरही सुरू राहील, असे सांगत फिरू लागले आहेत.

मराठवाड्यात अजित पवार यांच्या समर्थक आमदारांची संख्या शरद पवारांपेक्षा अधिक. पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण, शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, प्रकाश सोळंके, बाळासाहेब आसबे, बाबासाहेब पाटील, राजू नवघरे ही अजित पवार यांच्या पाठिशी राहिली.

वसमतमध्ये जयप्रकाश दांडेगावकर विरुद्ध राजू नवघरे अशी राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत होण्याची शक्यता आहे. अन्य मतदारसंघातही जागावाटपात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी विरुद्ध अजित पवार यांची राष्ट्रवादी उभी रहावी असे जागावाटपाचे सूत्र ठरले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे ' आपल्या' आमदारांना ताकद देण्यासाठी मराठवाड्यात अजित पवार दौरा करत आहेत. या दौऱ्यात पुन्हा एकदा आरक्षण प्रश्नावरुन आंदोलक त्यांना प्रश्न विचारत असल्याचे दिसून येत आहे. लोकसभेत आरक्षणाचा विषय तापल्यामुळे मराठवाड्यातून भाजप शुन्यावर आली. सत्ताधाऱ्यांच्या विरोधातील रोषाची झळ आता अजित पवार यांनाही बसू लागली आहे. आरक्षणाबाबतची भूमिका जाहीर करा, असे म्हणत कार्यकर्त्यांनी अजित पवार यांना घेरले. त्यामुळे गाडीतून उतरुन त्यांना मराठा आंदोलकांचे निवेदन स्वीकारावे लागले.

मराठवाड्यातील विविध मतदारसंघात जाताना अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे पक्षाचा असा कोणताही उपक्रम आखलेला नाही. त्यामुळे सरकारच्या योजनांच्या आधारे आणि कोणत्या मतदारसंघात किती निधी दिला, हे सांगत त्यांना प्रचार करावा लागत आहे. येत्या काळात कोणत्या मतदारसंघात ताकद लावायची, याची चाचपणीही केली जात असताना अजित पवार यांना आरक्षण मागणीच्या घोषणांना सामोरे जावे लागत आहे.

# माजी सैनिकाचा अन्यायाविरोधात ३३ वर्षापासून लढा

**मुंबई** : न्याय मागण्यासाठी एका माजी सैनिकाला सरकारी यंत्रणे विरोधात व लाल फितीच्या कारभारामुळे ३३ वर्ष आंदोलन करूनही न्याय मिळाला नाही. राष्ट्रपती, राज्यपाल, पंतप्रधान, मुख्यमंत्री आदी सर्व विभागाने याबाबत सामान्य प्रशासनाला पत्र देऊनही सामान्य प्रशासन विभाग न्याय देत नाही. त्यामुळे आझाद मैदानात आंदोलनास बसलेले माजी सैनिक अनंत लक्ष्मण निकम त्रासले असून अजून किती वर्ष मला आंदोलन करावे लागेल असा सवाल ते सरकारला करत आहेत.

राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या कार्यालयात पत्रव्यवहार केलेली सर्व कागदपत्र मी जपून ठेवली आहेत. भारतीय सैनिकांचे दिल्ली येथील मुख्यालय त्यांच्या कार्यालयात केलेला पत्रव्यवहार माझ्याकडे आहे. सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी स्वतः लक्ष घालून मला सहकार्य केले असतानाही महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग दिरंगाई करत आहे. मात्र जीव आहे तोपर्यंत लढाई लढणार असा इशारा अनंत लक्ष्मण निकम यांनी दिला आहे.मी एक खेळाडू आहे. त्यामुळे त्या प्रवर्गात नोकरी मिळाली मात्र अद्याप कॅप्टन पदाचे ओळखपत्र व पेन्शन आदेश मिळाले नाही. न्यायालयाने माझ्या बाजूने निकाल दिला आहे. तरीही सामान्य प्रशासन चाल ढकल करत आहे. त्यामुळे सरकारने जर मला न्याय दिला नाही तर हे आंदोलन तीव्र करणार असा इशारा त्यांनी दिला आहे.




# डॉ.भट्टड यांना महेश गौरव उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व पुरस्कार

**देऊळगाव राजे** : महेश प्रोफेशनल फोरम तर्फे देण्यात येणारा महेश गौरव उत्कृष्ट व्यक्तिमत्व२०२४ हा पुरस्कार दौंड मधील प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉक्टर प्रेमकुमार भट्टड यांना देण्यात आला.याप्रसंगी महेश प्रोफेशनल फोरम चे सर्व पदाधिकारी,समाजातील सर्व स्तरातील प्रतिष्ठित व्यक्ती ग.दि. माडगुळकर सभागृह,निगडी,पुणे येथे उपस्थित होते.हा पुरस्कार सर्व स्तरातील समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल दिला जातो. डॉक्टर प्रेम कुमार भट्टड यांच्या जीवन चारित्र्यावर आधारित सर्व पैलू तसेच वैद्यकीय क्षेत्रामध्ये त्यांनी केलेले समाजकार्य व त्याचबरोबर नेत्रदान चळवळीमध्ये त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे असलेले योगदान आदी विषयांवर प्रश्न उत्तरांच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आला.

# माणुसकी जोपासणारे व्यक्तिमत्व : अभियंता सतीश चिखलीकर

पुणे / रमेश जाधव

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभागात कार्यरत असणारे अभियंता सतीश चिखलीकर हे महाराष्ट्राच्या प्रशासकीय , सामाजिक ,राजकीय क्षेत्राला परिचित असणारे व्यक्तिमत्व ! प्रशासनात राहूनही त्यांचा जनसंपर्क विविध समूहाची आणि त्या क्षेत्रातील मान्यवरांशी जवळून राहिला आहे . त्यांचे नाव अभियंता क्षेत्रात अत्यंत आदराने आणि सन्मानाने घेतले जाते . नुकतीच सतीश चिखलीकर यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या सचिव या सर्वोच्च पदावर पदोन्नती मिळाली आहे .त्यांच्या पदोन्नतीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे .

अभियंता सतीश चिखलीकर हे नाव महाराष्ट्राच्या बांधकाम विभागाला वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना परिचित आहे . आज महाराष्ट्रासमोर चिखलीकर यांचे व्यक्तिमत्त्व आदराचे आहे . तो आदर आणि सन्मान मिळवण्यासाठी त्यांनी आपल्या जीवनात केलेला संघर्ष , घेतलेले कष्ट ,कामाप्रती बाळगलेली निष्ठा हे अनेकांना जीवन जगण्यासाठी धडे देणारी आहे .त्यांचे लहान पासून आजतागायतचे जीवन हे प्रेरणादायी असून सर्व स्तरातील अधिकारी वर्गाला भविष्यातही ते प्रेरणास्रोत ठरावे असेच आहे .

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून १९९३ साली श्रेणी वर्ग - १ मध्ये उत्तीर्ण झालेल्या अभियंता सतीश चिखलीकर यांचे अभियांत्रिकी शिक्षण औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात पूर्ण झाले .त्यानंतर त्यांनी सांगलीच्या वालचंद येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात एमई (स्ट्रक्चर)ही सर्वोच्च पदवी संपादन केली . तत्पूर्वी त्यांनी नांदेड येथेही अभियांत्रिकीचा डिप्लोमा पूर्ण केला . सन १९९५ मध्ये अभियंता चिखलीकर यांचे शासकीय सेवेत पदार्पण झाले .

दरम्यानच्या कालखंडात त्यांनी लातूर , नाशिक , पुणे , नगर आदी ठिकाणी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणारे अनेक महत्त्वकांशी प्रकल्प मार्गी लावले . आव्हानात्मक कामे अत्यंत सक्षमपणे आणि धाडसाने कोणत्याही अडचणींचा पाढा न वाचता पूर्णत्वास नेली . आपल्यातील क्षमता सिद्ध करून चिखलीकर यांनी शासकीय सेवेचे सोने केले . गेल्या २९ वर्षात एक बुद्धिमान अभियंता असल्याची चुणूक त्यांनी कामाच्या माध्यमातून दाखवून दिली . आव्हाने स्वीकारण्याची सवय असलेल्या अभियंता चिखलीकर यांनी आपल्या स्वभावानुसार सार्वजनिक बांधकाम विभागात आलेली आव्हाने सहजपणे पार करून इतरांनाही आपल्या बौद्धिक क्षमतांची ताकद दाखवून दिली आहे .

यशाने हुरळुन न जाता जमिनीवर राहून आकाशाला गवसणी घालणारे स्वप्न बघण्याची उमेद आणि त्या स्वप्नांना पंख देण्याची , पंखांना बळ देण्याची क्षमता अभियंता सतीश चिखलीकर यांच्यात असल्यामुळेच त्यांच्याविषयी मित्रपरिवाराला नेहमीच आदर वाटतो .चिखलीकर नेहमीच सर्वसामान्य व्यक्तीपासून साहित्यिक , विचारवंतांपर्यंत परिचित राहिले आहेत .अवघड कामगिरी त्यांनी सहजपणे पेलल्यामुळे शासनाने चिखलीकर यांना प्रतिष्ठेच्या पदावर बसवुन त्यांच्या शक्तीचा , ज्ञानाचा , प्रतिभेचा , विचारांचा आणि श्रमाचा समाजाच्या हितासाठी उपयोग करून घेतल्याचे दिसून येते . स्वतःला आणि सहकाऱ्यांना शासनाच्या विरुद्ध नव्हे तर शासनासाठी काम करायला लावणे आणि त्यातून शासनाच्या आणि समाजाचे हित साध्य करणे हे त्यांचे वैशिष्ट्य सहजपणे लक्षात येते . सकारात्मक विचारांनी घडलेले हे बहुआयामी व्यक्तिमत्व नेहमीच आपले वेगळेपण सिद्ध करत आले आहेत . नेहमी मोक्याच्या जागी विराजमान होता आले नसले तरी आज सचिव या सर्वोच्च पदावर ते विराजमान झाल्याचा सार्थ अभिमान वाटल्या वाचून राहत नाही .

मैत्री म्हणजे सुखाचा गुणाकार आणि दुःखाचा भागाकार हा स्पॅनिश विचार आहे .मैत्री आणि बंधुभाव हा तथागतांचा उपदेश आहे .अभियंता सतीश चिखलीकर हे मैत्री भावनेचा गुणाकार करणार व्यक्तिमत्व असल्याची जाणीव होते . मैत्रीने ते स्वतः तर सुखावतातच पण त्यांच्या सानिध्यात येणाराही शितल सुखाचा अनुभव घेऊन तोही सुखावतो . त्या मैत्रीत प्रेमाचा पाझर असतो . माणुसकीचे दुसरे नाव अभियंता चिखलीकर असल्याचा अनुभव आल्यावाचुन रहात नाही . प्राणीमात्रावर हृदयपूर्वक प्रेम करणे हीच खरी मानवत आहे .अभियंता सतीश चिखलीकर यांनी आपल्या आयुष्यात हा विचार कायमच रुजवलेला दिसून येतो .

खरे तर शासनाचा सर्वोच्च सचिव पदाचा पदभार स्वीकारलेल्या अभियंता चिखलीकर यांचा जीवन प्रवास जीवनाच्या सर्व आघाड्यांवर यशस्वी होण्यासाठी झगडणाऱ्यांना आदर्शवत असाच आहे . शासनाच्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांवर काम करत असताना कामाप्रती निष्ठा बाळगून आपणाला दिलेल्या जबाबदारीला पूर्णत्वाकडे घेऊन जाण्याची त्यांची असलेली सचोटी ही वाखाणण्याजोगी आहे .परिपूर्ण स्वातंत्र्याने आणि सर्वाधिक आनंदाने जीवन जगणारे अभियंता सतीश चिखलीकर बांधकाम विभागाची बौद्धिक संपदा म्हणून कार्यरत असल्याची खात्री पटल्यावाचून राहत नाही .

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# पश्चिम महाराष्ट्रातील दीड लाखांवर नागरिकांची अद्याप परवड

**पुणे :** यंदा जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे भीमा आणि कृष्णा खोऱ्यातील धरणे तुडुंब भरलेली असतानाही पश्चिम महाराष्ट्रातील तब्बल एक लाख ६७ हजार नागरिक अद्यापही तहानलेलेच असल्याचे स्पष्ट झाले आहे. या नागरिकांना ६९ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. गेल्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने काही तालुक्यांमध्ये सुरू झालेले टँकर अद्याप सुरू असल्याचे समोर येत आहे.



सर्वार्थाने सधन अशी ओळख असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात गेल्या वर्षी पावसाने ओढ दिली होती. त्यामुळे तीव्र उन्हाच्या झळांमुळे अनेक ठिकाणी पिके वाळली होती. सिंचनाची सोय असलेल्या भागातही पाण्याअभावी पिकांनी मान टाकली होती. परिणामी चारा उपलब्धतेवरदेखील परिणाम झाला होता. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर वगळता इतर चारही जिल्ह्यांतील नागरिकांना पाणीटंचाईची झळ बसली होती. विहिरींनी तळ गाठल्याने पाऊस कमी झालेल्या तालुक्यांत जनावरांच्या चाऱ्या-पाण्याची टंचाई जाणवत होती.

मात्र, यंदा मोसमी पाऊस सक्रिय झाल्यानंतर जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे भीमा आणि कृष्णा खोऱ्यातील बहुतांश धरणे भरली आहेत. कृष्णा खोऱ्यातील सर्व धरणांत ८० ते ८५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा जमा झाला आहे. भीमा खोऱ्यातील धरणे सुमारे ७० टक्के भरली आहेत. सर्वदूर पाऊस झाल्याने पुढील पावसाळ्यापर्यंत पाण्याची चिंता मिटली असल्याचे चित्र आहे. मात्र, प्रत्यक्षात अद्यापही पुणे जिल्ह्यातील एक गाव, साताऱ्यातील दहा गावे, सांगलीतील ३६ आणि सोलापूर जिल्ह्यातील सहा गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. एकूण ६९ टँकरपैकी २३ शासकीय, तर ४६ खासगी टँकरचा समावेश आहे. सर्वाधिक झळ सांगली, सोलापूर या जिल्ह्यांत बसत आहे.

**५३ गावांना टँकरने पाणीपुरवठा**

| जिल्हा | टँकर संख्या |
| --- | --- |
| पुणे | १ |
| सातारा | १० |
| सांगली | ४३ |
| सोलापूर | १५ |

बॉम्ब ठेवल्याचा ई- मेल

या पाणीटंचाईतून जनावरे देखील सुटलेली नाहीत. पुणे जिल्ह्यात २३२, सांगली २७ हजार ४२९, सोलापूर ५३९० असे एकूण ३३ हजार ५१ पशुधन बाधित असल्याचे विभागीय आयुक्तालयाकडून सांगण्यात आले.

# 'अजिंक्यतारा' ही पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव सक्षम सूत गिरणी : सौ. वेदांतिकाराजे

## सूत गिरणीची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

**सातारा :** स्व. भाऊसाहेब महाराजांनी दूरदृष्टी ठेवून अजिंक्य उद्योग समूहाची निर्मिती केली. आज अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना या मातृसंस्थेसोबतच अजिंक्यतारा सहकारी सूत गिरणी ही संस्थाही सक्षमपणे सुरु आहे. सूत गिरणीचे सूत देशासह परदेशी बाजारपेठेत निर्यात केले जात आहे. असंख्य सूत गिरण्या अडचणीत असतानाही प्रतिकूल परिस्थितीवर मात करून अजिंक्यतारा सूत गिरणी भक्कपणे कार्यरत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव सक्षम सूत गिरणी म्हणून अजिंक्यतारा सूत गिरणीचा नावलौकिक आहे, असे प्रतिपादन संस्थेच्या मार्गदर्शिका श्रीमंत छ. सौ. वेदांतिकाराजे भोसले यांनी केले.



वळसे ता. सातारा येथे अजिंक्यतारा सहकारी सूत गिरणीची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या आणि उत्साहाच्या वातावरणात सपंन्न झाली. या सभेत सौ. वेदांतिकाराजे बोलत होत्या. सभेच्या अध्यक्षस्थानी गिरणीचे चेअरमन उत्तमराव नावडकर होते. यावेळी व्हा. चेअरमन बापूसाहेब महाडिक, अजित साळुंखे, जगन्नाथ किर्दत, गुलाब भोसले, सौ. लता जाधव, रत्नमाला डांगे, सर्जे राव सावंत, दिलीप निंबाळकर, आबासो साबळे, महिपती ठोके, शिवाजीराव जाधव, बाळासाहेब लोहार, विष्णू सावंत, भानुदास मोहिते, मधुकर यादव, मोहनराव जाधव, अंकुश डांगे, भानुदास चवरे, कार्यकारी संचालक संजय कुलकर्णी यांच्यासह सर्व पदाधिकारी, आजी- माजी संचालक यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्व. भाऊसाहेब महाराजांच्या सभासद हित जोपासण्याच्या विचारधारेला अनुसरून आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली अजिंक्य उद्योग समूहाची यशस्वी घोडदौड सुरु आहे. अजिंक्यतारा सूत गिरणीच्या प्रगतीचा आलेख कायम चढता राहिला असून सभासद, कामगार- कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे सूत गिरणी देशात नावलौकिक मिळवेल, असे सौ. वेदांतिकाराजे भोसले म्हणाल्या.

चीफ अकाउंटंट मानसिंग पवार यांनी सभेपुढील विषयांचे वाचन केले. सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. चेअरमन नावडकर यांनी प्रास्ताविक केले. संचालक अजित साळुंखे यांनी स्वागत केले. संचालक जगन्नाथ किर्दत यांनी आभार मानले. सभेला सर्व पदाधिकारी, सभासद आणि कामगार कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संभाजीनगर येथे धार्मिक, शैक्षणिक स्थळांसाठी डस्टबिनचे वाटप

**सातारा :** संभाजीनगर ता. सातारा ग्रामपंचायतीचे वतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व धार्मिक व शैक्षणिक स्थळांना डस्टबिनचे वाटप सरपंच सतीश माने यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वच्छ व समृद्ध संभाजीनगर ही संकल्पना अमलात आणण्यासाठी ग्रामपंचायतीचेवतीने हा लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायत हद्दीत असणारी सर्व धार्मिक स्थळे व शाळा या ठिकाणी भाविकांची, विद्यार्थ्यांची व ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा सार्वजनिक ठिकाणी निर्माल्य,पूजा साहित्य यांची वेस्टने, बागबगीच्या चा पालापाचोळा, खाद्यपदार्थांची वेस्टने इत्यादी प्रकारच्या कचरा संकलनाची गैरसोय असल्याने परिसर अस्वच्छ होत होता. स्वच्छ व समृद्ध संभाजीनगर ही संकल्पना सत्यात आणून प्रभावीपणे अमलात आणण्यासाठी, सार्वजनिक ठिकाणी कचरा संकलनासाठी लागणाऱ्या मोठ्या आकाराच्या डस्टबिनची गरज ओळखून, ग्रामपंचायतच्यावतीने मोठ्या आकाराच्या डस्टबिनचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी सरपंच सतीश माने, उपसरपंच काशिलिंग गोरड, गटनेते सुभाष उर्फ दादा तांगडे, सदस्य अनिल पिसाळ, गिरीश ढेंबरे,, सौ. मेघा राणी जाधव, दत्तात्रेय जगताप, सुनील फडतरे, बी. आर. राजे, कार्याध्यक्ष जयवंतराव मोरे, ग्रामविकास अधिकारी मोहन कोळी तसेच सर्व गृहनिर्माण संस्था व नागरी वसाहतींचे चेअरमन सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गणेशचतुर्थी ते इद ए मिलाद; तब्बल १५ दिवस राहणार बँका बंद

**मुंबई :** राज्यात आता गणेशोत्सोवासह अनेक सणसमारंभ जवळ आले आहेत. ऑगस्ट महिना आता संपत आला आहे. त्यामुळे आपल्या बँकेच्या कामांचं योग्य नियोजन करा कारण सप्टेंबर महिन्यात १५ दिवस बँकांना सुटी राहणार आहे. त्यामुळे बँकेच्या सुट्टीच्या दिवशी नेमकं तुमचं कामाचं नियोजन यायला नको. सप्टेंबर महिन्यात यंदा विविध राज्यांमध्ये तब्बल १५ दिवस बँका बंद राहणार आहेत. यामध्ये दुसरा आणि चौथ्या शनिवारसह रविवारचाही समावेश आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ग्राहकांची गैरसोय होऊ नये यासाठी बँकेला सुट्ट्या कधी राहणार याची महिन्याची यादी जाहीर करत असते. यानुसार गणेशचतुर्थी ते इदमिलादपर्यत विविध राज्यांमध्ये बँकांना सुटी राहणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पालघरमध्ये

**पालघर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदल प्रकल्पाचे ते भूमीपूजन करणार आहेत. सकाळी सुमारे ११ वाजता पंतप्रधान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये 'ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२४' ला संबोधित करतील. त्यानंतर दुपारी दीडच्या सुमारास पंतप्रधान पालघरमधील सिडको मैदानावर विविध विकास प्रकल्पांचे उद्धाटन आणि पायाभरणी करतील.

पंतप्रधान मोदींच्या हस्ते वाढवण बंदराचे भूमीपूजन करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ७६,००० कोटी रुपये आहे. जागतिक दर्जाचे सागरी प्रवेशद्वार स्थापन करणे हे यामागचे उद्दिष्ट असून डीप ड्राफ्ट मुळे मोठ्या कंटेनर जहाजांना तसेच अति-मोठ्या मालवाहू जहाजांना या बंदरांवर थांबा घेता येईल. त्यामुळे देशाच्या व्यापार आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल.पालघर जिल्ह्यातील डहाणू शहराजवळ असलेले वाढवण बंदर, भारतातील सर्वात मोठ्या खोल पाण्यातील बंदरांपैकी एक असेल आणि आंतरराष्ट्रीय नौवहन मार्गांना थेट कनेक्टिव्हिटी प्रदान करेल,वाहतुकीचा वेळ आणि खर्च कमी करेल. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांनी सुसज्ज अशा या बंदरात डीप बर्थ, कार्यक्षम कार्गो हाताळणी सुविधा आणि आधुनिक बंदर व्यवस्थापन प्रणाली असतील. या बंदरामुळे रोजगाराच्या संधीत लक्षणीय वाढ होईल, स्थानिक व्यवसायांना चालना मिळेल आणि प्रदेशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला मदत होईल अशी अपेक्षा आहे.

# वाढे फाटा परिसरात टोळक्याचा धुडगूस; दोन अल्पवयीन ताब्यात

**सातारा :** वाढे फाटा परिसरात व्यवसायिकाला कोयत्याचा धाक दाखवून गंभीर दुखापत करत प्रतापसिंहनगरमधील टोळक्याने धुडगूस घातला. संशयितामध्ये सराईत गुन्हेगाराचा समावेश असून पोलिसांनी दोघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

याबाबत केतन श्रीराम लाटकर (वय २९, रा. शुक्रवार पेठ, सातारा) यांनी तीन अज्ञातांविरुध्द तक्रार दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, ही घटना दि. २८ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. तक्रारदार लाटकर तेथे थांबले असताना संशयित तीन अनोळखी युवकांनी त्यांना बोलावले. यावेळी तक्रारदार यांचा मोबाईल संबंधितांनी जबरस्तीने चोरला. यावेळी तक्रारदार यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता संशयितांनी धारदार कोयत्यासारखे शस्त्र काढून दहशत माजवली. तसेच तक्रारदार लाटकर यांच्या डोक्यावर, पायावर, पाठीवर, डाव्या हातावर वार करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. लाटकर जखमी अवस्थेत पडल्यानंतर संशयितांनी तेथून दुचाकीवरुन पळ काढला.

या घटनेची माहिती सातारा तालुका पोलिसांना समजल्यानंतर त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी लाटकर यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला. संशयितांचे वर्णन घेवून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. पोनि निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला सुरुवात केल्यानंतर बुधवारी सांयकाळी दोन युवकांना ताब्यात घेण्यात आले. संशयित हल्लेखोर प्रतापसिंहनगर येथील असून मुख्य संशयित हल्लेखोर पसार असल्याचे समोर येत आहे.

# लाडक्या बहिणींच्या पदरी निराशा सरकारने दिले ३००० रुपये, हाती पडले ५००, १००० रुपये!

**मुंबई :** मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे पैसे पात्र महिलांच्या खात्यावर जमा झाले आहेत. राज्य सरकारने महिलांना ३००० रुपये दिले असताना, त्यांच्या हातात प्रत्यक्षात ५०० आणि १००० रुपये पडले असल्याचे समोर आले आहे. बँकांकडून किमान शिल्लक शुल्क, जीएसटी आणि एसएमएस शुल्काच्या नावाखाली ही कपात करण्यात आली आहे. त्यामुळे आता अनेक लाडक्या बहिणींच्या पदरी

राज्य सरकारने मोठा गाजावाजा करत, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू केली. रक्षाबंधनाचे औचित्य साधून, राज्यभरातील पात्र महिलांच्या खात्यावर जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्याचे योजनेचे पैसे जमा देखील झाले. मात्र, आता सरकारने महिलांना ३००० रुपये दिले असताना, त्यांच्या हातात प्रत्यक्षात ५०० आणि १००० रुपये पडले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता अनेक लाडक्या बहिणींच्या पदरी निराशाच पडली आहे.

याबाबत पुणे आणि सातारा जिल्ह्यातून याबाबत हजारो महिलांच्या तक्रारी समोर येत आहे. यामध्ये प्रामुख्याने महिलांच्या खात्यात योजनेचे पैसै जमा तर झाले, मात्र बँकांनी दंडाच्या नावाखाली अनेक महिलांचे पैसे कापले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू असताना, राज्य सरकारच्या लाडकी बहिण योजनेचा निधी महिलांच्या खात्यात जमा होऊ लागला आहे. असे असतानाच बँका या निधीतून मोठ्या प्रमाणात कपात करत असल्याचे अहवाल सांगतात. त्यामुळे अनेक महिलांचा योजनेबाबत भ्रमनिरास झाला.

पुणे जिल्ह्यात हजारो महिलांनी त्यांच्या लाडकी बहिण योजनेचा निधी जमा तर झाला. मात्र, बँकांनी तो किमान शिल्लक शुल्क, जीएसटी आणि एसएमएस शुल्क यांसारखी कारणे देत कापला असल्याचे म्हटले आहे. तर सातारा जिलह्यात देखील याबाबत अनेक महिलांनी बँकांकडून पैसे कपात झाल्याचे सांगितले जात आहे. मिनिमम बॅलन्सच्या नावाखाली बँकांनी दंड वसूल केल्याने, महिलांच्या हाती अवघे ५०० ते १००० रुपये आले आहेत. त्यामुळे गेल्या दोन-तीन दिवसांत महिला आणि बँक कर्मचारी यांच्यात वाद-विवाद झाल्याचे पाहायला मिळाले.

याबाबत काही महिलांनी बँक अधिकाऱ्यांकडे पैसे कपातीची तक्रार केली असताना, संबंधित महिलांच्या खात्यात कमीत कमी जेवढी रक्कम पाहिजे. तितकी रक्कम नसल्याने तुम्हाला दंड लागला व ती रक्कम सिस्टिमने कापली, असे बँक अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, बँकांनी लाडकी बहिण योजनेच्या निधीतून ही शुल्क कपात करणे तात्काळ थांबवावी, अशी मागणी पिंपरी चिंचवड स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे यांनी केली आहे. ही कपात सुरू राहिल्यास बँकांविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत आदेश देण्याची विनंती केली आहे. याशिवाय काही प्रकरणांमध्ये, बँकांनी महिलेच्या पती किंवा पालकांसोबत असलेल्या संयुक्त खात्यांमध्ये जमा केलेल्या पैशांमधून दंड कपात करणे किंवा कर्ज वसूल करणे सुरू केले आहे.

# जिल्हा पोलीस दलाचे कौतुक

**सातारा :** महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या संवेदनशील गुन्हे घडत आहेत. राज्यात घडत असलेल्या जातीय, धार्मिक घडामोडी तसेच आगामी काळात असलेले सण, उत्सव या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर सुनिल फुलारी यांनी जिल्हयाची आढावा बैठक घेतली आहे. या बैठकीत जुलै २०२३ पेक्षा जुलै २०२४ मध्ये गुन्हयांची संख्या घटल्याबाबत जिल्हा पोलीस दलाचे कौतुक केले. तसेच गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण चांगले असल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यापुढे भविष्यात देखील घडणाऱ्या गुन्हयास प्रतिबंध करण्याकरता पोलीस ठाणे हद्दीत बीट मार्शल पेट्रोलिंग, पायी गस्त, प्रभावी रात्रगस्त, वेळोवेळी कोंबींग ऑपरेशन राबविणे, दृश्य पोलीसींग करणे, प्रत्येक गावात भेटी देवून लोकांमध्ये विश्वास निर्माण करणे, घडलेल्या गुन्हयांचा तात्काळ तपास करुन आरोपींचा शोध घेणे याबाबत सूचना देवून मार्गदर्शन केले.

या बैठकीमध्ये राज्यात सध्या घडत असलेले बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर तसेच महिलांविषयीचे विविध गुन्हे तसेच जातीय, धार्मिक तणावाच्या घडामोडी अनुषंगाने घ्यावयाची दक्षता व करावयाच्या विविध उपाययोजना याबाबत जिल्हा पोलीस दलाचा सविस्तर आढावा घेतला. यामध्ये प्रामुख्याने मुली व महिलांबाबतीत घडणाऱ्या गुन्हयाबाबत तात्काळ प्रतिसाद देवून गुन्हा दाखल करावा, गुन्हयातील आरोपींना तात्काळ अटक करावी, अटक केलेल्या आरोपींचेवर कडक प्रतिबंधक कारवाई करावी, दामिणी/निर्भया पथकाने सतर्क राहून गस्तीदरम्यान महिलाविषयक गुन्हयांना प्रतिबंध करणे, शाळा कॉलेजमध्ये जावून मुले / मुली यांना मार्गदर्शन करणे, आक्षेपार्ह किंवा अनुचित घडणाऱ्या घटनेवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

आगामी काळात येणारे गणेशोत्सव, ईद व इतर धार्मिक सण व उत्सवांच्या बाबतीत कोणतेही दुर्लक्ष न करता योग्य ती दक्षता घेवून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याबाबत सूचना दिल्या. पूर्वी दाखल असलेल्या आरोपींवर योग्य ती प्रतिबंधक कारवाई करुन त्यांचे हलचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. आगामी येणाऱ्या सणांच्या पार्श्वभूमीवर गावभेटी देणे, शांतता कमिटीच्या बैठका घेणे, गणेश मंडळाच्या बैठका घेणे, चांगले काम करणाऱ्या गणेश मंडळीना प्रोत्साहनपर बक्षिस देणे, इतर शासकीय खात्यांसोबत समन्वय ठेवून त्यांचेशी पत्रव्यवहार करुन पाठपूरावा करणे, उपद्रवी लोकांचे हलचालींवर लक्ष ठेवणे, सोशल मिडीया मॉनिटरींग करुन अनुचित संदेश व पोस्ट करणारे लोकांवर कायदेशीर कारवाई करणे, दंगा काबू योजना राबवणे, संवेदनशील ठिकाणी रुट मार्च आयोजित करुन कोणत्याही प्रकारे जातीय, धार्मिक तणाव वाढणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

जिल्हयात घडत असलेल्या गुन्हयांच्या अनुषंगाने माहिती घेतली. फायर आर्म (अग्नीशस्त्र) बाबती विशेष पथक तयार करुन सक्रीय असणाऱ्या टोळयांना व इसमांना शोधून ठोस कायदेशीर कारवाई करणेबाबत सूचना दिल्या. पोलीस ठाणे हद्दीत नवीन अद्यावत करण्यात आलेली बिट मार्शल पेट्रालिंग व्यवस्था, रात्रगस्तीमध्ये केलेले बदल, सराफ कट्टा, बझार अशा गर्दीच्या ठिकाणी चालू केलेली पायी पेट्रोलिंग तसेच वरिष्ठांच्या आदेशाने वेळोवेळी राबविण्यात आलेली कोंबिंग ऑपरेशन अशा विविध उपायांमुळे जुलै २०२३ अखेरच्या तुलनेत जुलै २०२४ अखेर गुन्हयांचे प्रमाण कमी करण्यास सातारा पोलीसांना यश मिळाले असल्याबाबत माहिती घेवून समाधान व्यक्त केले.

पोलीस अभिलेखावरील आरोपी शेख सुरेश भोसले रा. खामगाव ता. फलटण जि. सातारा याचेकडून दरोडा, जबरी चोरी, घरफोडीचे २६ गुन्हे उघड करुन ३९,०९,०००/- रुपये किमतीचे ५४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे हस्तगत करणारे स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बक्षिस व प्रशंसा पत्र देवून गौरवले आहे. तसेच नमूद २६ गुन्हयातील फिर्यादी यांना सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर यांच्याकडून मुद्देमाल (सोन्याचे दागिणे ) परत करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सातारा तालूका पोलीस ठाणे गु.र.नं. ३११/२०१९ भादविक ३०२ या गुन्हयातील आरोपी जन्मठेप व ५०००/-रुपये दंड अशी शिक्षा झाल्याने नमुद गुन्हयाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांना बक्षिस व प्रशंसा पत्र देवून गौरवले आहे. या बैठकीस पोलीस अधीक्षक समीर शेख, जिल्हा पोलीस दलातील सर्व शाखांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

# कोयना धरणातून विसर्ग वाढवला

## दरवाजे साडेतीन फुटांनी उचलून ३३ हजार क्युसेक्स विसर्ग सुरू



**पाटण :** कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम असून अंतर्गत नद्या, नाले, ओढे, धबधबे यातून प्रतिसेकंद सरासरी ३८ हजार ९१३ क्युसेक्स पाण्याची आवक धरणात सुरू आहे. धरणात सध्या १०३.४१ टीएमसी पाणीसाठा झाला असून साठवण क्षमता संपुष्टात आल्याने धरणातून सोडण्यात येणारे पाणी गुरूवारी वाढवण्यात आले. आज पहाटे ६ वाजता धरणाचे ६ वक्र दरवाजे २ फुटावरून ३ फूट ६ इंचापर्यंत उचलून पूर्वेकडे कोयना नदीपात्रात प्रतिसेकंद ३३ हजार ५० क्युसेक्स पाणी सोडण्यात आले आहे. या पाण्यामुळे कोयना नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाल्याने नदीकाठच्या गावांना धरण व्यवस्थापनाने सावधानतेचा इशारा दिला आहे.

कोयना धरणात सध्या ९८.२५ टक्के पाणीसाठा झाला आहे.

गुरुवारी सकाळी ८ वाजेपर्यंत व १ जूनपासून आजपर्यंत एकूण पडलेला पाऊस पुढीलप्रमाणे : कोयनानगर ८६ (४९३२), नवजा ९४ (५८२८), महाबळेश्वर ८७ (५६४२) मिलिमीटर नोंद झाली आहे तर धरणातील पाणीपातळी २,१६२.०१ फूट व ६५९.००३ मीटर इतकी झाली आहे. धरणात अपेक्षित पाणीसाठा झाल्याने आगामी काळातील सिंचन व वीजनिर्मितीची चिंता पूर्णपणे मिटली आहे. याशिवाय महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश राज्यांच्या सिंचनाची महत्त्वाची गरजही पूर्ण झाली आहे.

# कोल्हापुरात प्रथमच खाशाबा जाधव यांच्या दुर्मिळ वस्तूंचे प्रदर्शन

**कोल्हापूर** - कोल्हापुरात प्रथमच देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या अमूल्य आणि दुर्मिळ वस्तूंच्या संग्रहालयाचे प्रदर्शन शिवाजी विद्यापीठाच्यावतीनं भरवण्यात आलंय. हे प्रदर्शन आजपासून दोन दिवस सर्वांसाठी खुलं असणार आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि खाशाबा जाधव यांचे पुत्र रणजीत खाशाबा जाधव यांच्या हस्ते झालं.

यावेळी रणजीत जाधव यांनी, जाज्वल्य देशप्रेम, उत्तुंग इच्छाशक्ती आणि उच्च नैतिक मूल्यांची जोपासना या त्रिसूत्रीची जोपासना करीत देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक विजेते खाशाबा जाधव यांनी आयुष्य व्यतित केले.

उदयोन्मुख क्रीडापटूंनी त्यांचा हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल



करावी, असं आवाहन केले

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, विद्यापीठाच्या कुस्ती संकुलातील पहिला उपक्रम हा खाशाबा जाधव यांच्याशी निगडित असल्याचा मोठा अभिमान वाटत असल्याचं सांगितले.

या प्रदर्शनात खाशाबा जाधव यांनी ऑलिंपिक व आशियाई स्पर्धांसह विविध स्पर्धांत जिंकलेली पदके, चषके, स्मृतिचिन्हे, ऑलिंपिक स्पर्धेमध्ये घातलेला ब्लेझर व पोषाख, पोलीस सेवेतील कॅप्स, वेपन, हॉकी स्टीक, दुर्मिळ छायाचित्रे, हस्तलिखित पत्रे त्यांच्याविषयी प्रसिद्ध झालेले लेख, बातम्या इत्यादी बाबी मांडण्यात आल्या आहेत.

जाधव कुटुंबियांनी प्रथमच अशा प्रकारे खाशाबा जाधव यांच्याशी निगडित अमूल्य व दुर्मिळ वस्तूंचा संग्रह नागरिकांना पाहण्यासाठी खुला केलाय. प्रदर्शन पाहण्यासाठी शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींची मोठी गर्दी होत आहे.

# हणमंतराव गायकवाड-चेअरमन बी.व्ही.जी. ग्रुप यांना २०२३ चा सातारा भूषण पुरस्कार

**सातारा** : येथील रा. ना. गोडबोले सार्वजनिक ट्रस्ट व सातारकर नागरिक यांच्यातर्फे दरवर्षी सातारा भूषण पुरस्कार एखाद्या क्षेत्रात वैशिष्ठपूर्ण योगदान देणाऱ्या सातारा जिल्ह्यातील व्यक्तीस दिला जातो. सन २०२३ या वर्षाचा सातारा भूषण पुरस्कार बी. व्ही. जी. ग्रुपचे चेअरमन श्री. हणमंतराव गायकवाड यांना सोमवार दिनांक २ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता वाजता राजवाडा परिसरातील श्री समर्थ सेवा मंडळाच्या समर्थ सदन सांस्कृतिक केंद्र येथे वितरित करण्यात येणार आहे.

सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय नामदार शंभूराज देसाई यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सातारा जावली तालुक्याचे विद्यमान आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित राहणार असून यावेळी रयत शिक्षण संस्थेचे प्रमुख संघटक डॉ. अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

पुरस्काराचे हे ३३ वे वर्ष असून १९९१ पासून हा पुरस्कार सातारा जिल्ह्यातील कर्तृत्ववान व्यक्तींना त्यांचे सामाजिक, क्रीडा, कला, साहित्य, औद्योगिक क्षेत्रातील कामगिरी पाहून रा. ना. गोडबोले (सार्वजनिक) ट्रस्ट व सातारा जिल्ह्यातील नागरिकांचे वतीने देण्यात येतो.

हणमंतराव गायकवाड यांचा जन्म रहितमपूर येथील असून कठीण परिस्थितीत शिक्षण घेऊन ते इंजिनिअर झाले, स्वामी विवेकानंदांचे विचाराने प्रेरणा घेऊन त्यांनी भारत विकास ग्रुप स्थापन केला. संपूर्ण भारतात व लंडन, सिंगापूर येथेही त्यांचे कार्य चालू आहे.



राष्ट्रपती भवन, संसद, पंतप्रधान निवासस्थान, अमृतसर गुरूद्वारा, श्री सिध्दीविनायक मंदिर, दिल्ली, मुंबई, बेंगलोर विमानतळे या ठिकाणी त्यांचे सुमारे १ लाख कर्मचारी काम करतात. शेतकर्यांचे विकासासाठी व उत्तम उत्तम आयुर्वेदिक औषधे निर्माण करण्यासाठी ते प्रयत्नशील आहे.

स्वामी विवेकानंदाच्या विचाराने स्फूर्ती घेऊन वयाच्या १९ व्या वर्षी भारत विकास प्रतिष्ठान स्थापन करण्याऱ्या जिद्दी युवकाची उत्तुंगे गरुडभरारी ही विस्मयित करणारी आहे. सातारा जिल्ह्यातील कोरेगांव तालुक्यातील रहिमतपूर या लहान गावात जन्म ! लहानपण १०१० च्या खोलीत, वडीलांचे बालपणीच निधन अशा अनेक अडथळ्यांशी सामना करीत यशस्वी होणे फार अवघड. आई शिक्षिका व तिचा आणि तिचे सुसंस्कार यांचा पाठिंबा ! शालेय शिक्षण पूर्ण करुन इंजिनियर होण्यासाठी कमवा व शिका या योजनेखाली १० कि.मी सायकलवरुन प्रवास करताना ही जिद्दीची ज्योत फुलत राहिली.

१९९४ ला पुणे येथे टेल्को-टाटा मोटर्स, मध्ये ट्रेनी इंजिनियर म्हणून नोकरीस सुरुवात केली. तेथेच कंपनीला स्वच्छतेसाठी माणसे हवी होती व गावाकडील मुले हणमंतराव यांचेकडे काम मिळावे म्हणून भेटत होती. त्यांना मदतीला घेऊन भारत विकास ग्रुप ची १९९७ ला ८ माणसांपासून सुरुवात झाली. आता २ लाख माणसांना रोजगार देणारी कंपनी आहे. २५ वर्षातील ही झेप आश्चर्यकारक वाटेल पण मिळालेल्या संधीचे सोनं करायच्या व त्यासाठी नियोजन व कष्ट करण्याच्या वृत्तीमुळे हे शक्य झाले .

टाटा मोटर्स पासून सुरु झालेले हाऊस-किपींग चे कामाची आज त्यांनी एक इंडस्ट्री म्हणून प्रगती केली आहे. संसदेच्या ग्रंथालयाचे काम मिळाले, ते चांगले केल्यामुळे दिल्लीतील संसद, राष्ट्रपती भवन, सुप्रीम कोर्ट, पंतप्रधान निवासस्थान वगैरे ठिकाणी संधी मिळाली. तेथील कार्याच्या उच्च दर्जामुळे सोमनाथ मंदिर, गोल्डन टेंपल, सिद्धीविनाय अशी २० मंदिरे तसेच दिल्ली, बेंगलोर, मुंबई अशा २३ विमानतळांचे काम मिळाले. एवढ्यावर समाधान मानतील तरी कसे? त्यांची मनोभूमी भारत विकासाची आहे. शेतकऱ्यांची बिकट अवस्था त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. यवतमाळ येथे २००० व चंद्रपूर येथील ५००० शेतकऱ्यांना दत्तक घेऊन त्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी त्यांनी श्रीव योगदान दिले.

# पुण्यात ४ मे रोजी 'संविधान अभ्यास वर्ग'

कॉ. शेख काका व डॉ. दाभोळकर यांच्या स्मृत्यर्थ कॉ. धनाजी गुरव यांचे २० रोजी व्याख्यान

सातारा : सातारा जिल्ह्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व प्रतिसरकार चे प्रमुख नेते स्मृतीशेष कॉ. शेख काका व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक स्मृतीशेष शहिद डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवार दि २० ऑगस्ट रोजी संध्याकाळी सहा वाजता विद्रोही सांस्कृतिक चळवळ , महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष कॉ धनाजी गुरव (इस्लामपूर) यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.


परिवर्तनवादी संघटना समन्वय समिती सातारा यांच्यावतीने दोन्ही नेत्यांना अभिवादन व जाहीर सभा असा कार्यक्रम मंगळवार दि. २० रोजी संध्याकाळी सहा वाजता श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालयाच्या पाठक हॉल मध्ये घेतला आहे. कॉ. धनाजी गुरव यांचे

# येरळा नदीच्या पुलावरुन वाहून गेलेल्या महिलेचा मृतदेह सापडला

**तासगाव** : सोमवारी तासगाव येथील जुना सातारा रस्त्यावरील येरळा नदीच्या पुलावरुन एक वयोवृद्ध दांपत्य दुचाकीसह वाहून गेले होते. तेव्हा पासून एनडीआरएफ पथका मार्फत 'त्या' दोघांचा शोध सुरु होता. आज तिसऱ्या दिवशी (बुधवार) दुपारी ४ वाजता शोध सुरु असताना नदी पात्रात एका जॅकवेलमध्ये अडकलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह एनडीआरएफ पथकाच्या हाती लागला तर, बेपत्ता असलेल्या वृद्धाचा 'एनडीआरएफ' कडून शोध सुरु असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांनी दिली.

सोमवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास सातारा जिल्ह्यातील दत्तात्रय उत्तम पवार व रेखा दत्तात्रय पवार हे दोघे दांपत्य दुचाकीवरुन तासगावहून कोरेगावला निघाले होते. दरम्यान, वाटेत असलेल्या येरळा नदी पुलावरुन पाणी वाहत होते. प्रशासनाने हा पूल रहदारीसाठी बंद केला होता. तरीही जबरदस्तीने हा पुल ओलांडत असताना दत्तात्रय व रेखा हे दोघे दुचाकीसह नदी पात्रात कोसळले व वाहून गेले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर, पोलिसांनी तातडीने धाव घेतली व एनडीआरएफ पथक पाचारण करुन त्या दोघांचा शोध सुरु केला. एनडीआरएफ जवानांकडून सलग तीन दिवस शोध कार्य सुरु होते. नदीपात्रात पाण्याचा प्रवाह गतीने असल्याने शोध कार्यात अडथळे निर्माण होत होते. मात्र, बुधवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास नदीपात्रातील



एका जॅकवेलमध्ये अडकलेला रेखा या वृद्ध महिलेचा मृतदेह एनडीआरएफच्या हाती लागला. यावेळी, नदी काठावर नातेवाईकासह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

बुधवारी रेखाचा मृतदेह नदीपात्रातून शोधून काढल्यानंतर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला असल्याची प्राथमिक माहिती एनडीआरएफ टीमचे प्रमुख महेंद्रसिंह पुनिया यांनी दिली. तर, पोलिसांनी रेखाचा मृतदेह ताब्यात घेवून शव विच्छेदनासाठी पाठविला. या शोधकार्यात एनडीआरएफ टीमसह तहसीलदार अतुल पाटोळे तलाठी पतंग माने, पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांच्यासह पोलीस अंमलदारांनी सहभाग घेतला होता.

नदी पात्रात अत्यंत गतीने प्रवाह सुरु असलेल्या एका ठिकाणी काळ्या रंगाचे काहीतरी दिसले. त्याचा शोध घेण्यासाठी पथकाची बोट पुढे घेत असता प्रचंड प्रवाहातून बोट बाजूला सरकत होती मात्र, अधिकच्या कसरतीने व अनुभवातून एनडीआरएफ पथकाने दोन बोटी एकत्र उभा करुन, त्या ठिकाणी शोध घेतला. यावेळी, महिलेच्या हाताची दोन बोटे दिसून आली. पुढे मुळापर्यंत पाहिल्यानंतर त्या महिलेची साडी जॅकवेलमध्ये अडकली होती. एकीकडे बोट स्थिर होत नव्हती आणि मृतदेह सोडला तर, पुन्हा तो शोधण्यास अडथळ निर्माण होणार होता अशा थरारतून मृतदेह बाहेर काढण्यास एनडीआरएफला यश आले.

# अनुदानाची गोडी : नव्याने ५९० दूध संस्थांचे प्रस्ताव

**सोलापूर** : राज्यात दूध खरेदी दरात मोठी घसरण झाल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलीटर पाच रुपये अनुदान देण्याचा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. ११ जानेवारी ते १० मार्च या कालावधीत दिलेल्या अनुदानासाठी राज्यातून १८ जिल्ह्यांतील २४४ दूध संस्थांचे प्रस्ताव आले होते. त्या संस्थांनी दाखल केलेल्या प्रस्तावानुसार दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान दिले होते.जुलै ते सप्टेंबर या कालावधीसाठी प्रति लीटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी २३ जिल्ह्यांतील ५९० दूध संस्थांचे प्रस्ताव अनुदानासाठी जिल्हा दुग्ध विकास कार्यालयाकडे दाखल झाले आहेत.शासन ते शेतकरी अशी दूध अनुदान योजना राबविण्यात येत आहे. जानेवारी ते मार्चच्या अनुदानासाठी २४४ दूध संस्थांचे प्रस्ताव होते. जुलै ते सप्टेंबर या कालावधीतील अनुदानासाठी नव्याने ५९० संस्थांचे प्रस्ताव आले आहेत. थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर दूध अनुदानाची रक्कम राज्यात प्रथमच जमा होत आहे.

- प्रशांत मोहोड,

आयुक्त, दुग्ध विकासजानेवारी ते मार्च - ऑगस्ट ते ऑक्टोबर दाखल प्रस्ताव

पुणे (३२ - ८१), सातारा (२४ - ५८),सोलापूर(१८ - ८९), कोल्हापूर (१२ - ००), सांगली (१२ - ३०), नागपूर (०३ - ०४), गोंदिया (०० - ०१) , वर्धा (०० - ०१), भंडारा (०२ - ०२), अहमदनगर (७४ - १६०), जळगाव (०२ - १२), नाशिक ( १८ - ५२),



धुळे (०३ - ०९), बीड (०६ - १२), छ. संभाजीनगर (१२-२२), धाराशिव (१३ - ३३), जालना (०१ -०४), लातूर (०१ - ०६), नांदेड (०० - ०४), परभणी (०० - ०४), अमरावती (०० - ०२), बुलढाणा ( ०२ - ०२), यवतमाळ (०० - ०२).

एकूण - २४४ - ५९०

## केंद्रीय राज्य मंत्री पदावर हॅट्रीक झाल्यामुळे सत्कार

**मुंबई** : भारत सरकारमध्ये सलग तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांचा मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षातर्फे मंगळवार ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबईत षणमुखानंद हॉल सायन येथे भव्य सत्कार सोहळा आयोजीत करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री 'लाडकी बहीण' योजनेविरोधात कोर्टात याचिका

## भाजपाचा काँग्रेसवर घणाघात

राज्यात काही दिवसातच विधानसभेच्या निवडणुका सुरू होणार आहेत. याआधी पावसाळी अधिवेशनात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' ही महत्वपूर्ण योजना सुरू केली आहे. महिलांच्या खात्यात या योजनेचे पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. तर दुसरीकडे या योजनेविरोधात कोर्टात याचिका दाखल केल्याची माहिती समोर आली. दरम्यान, यावरुन आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. या याचिकेवरुनभाजपानेकाँग्रेसवरजोरदार आरोप केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा प्रकरणी उच् एकनाथ शिंदेंची माफी; विरोधकांना केलं आवाहनलाडकी बहीण योजनेविरोधात दाखल केलेल्या याचिकेवरुन आता भारतीय जनता पार्टीचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव यांनीकाँग्रेसवरटीका केली.'

लाडकी बहीण योजनेला महिला वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने विरोधकांकडून जाणूनबुजून योजनेच्या विरोधात मोहीम सुरू आहे. योजनेचे यश



डोळ्यात खुपत असल्याने काँग्रेस नेते सुनील केदार यांचा कार्यकर्ता असलेल्या अनिल वडपल्लीवार याने लाडकी बहिण योजनेविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. वडपल्लीवार यांच्या मार्फत काँग्रेस आणि महाविकास आघाडी, लाडकी बहिण योजनेविरोधातील त्यांचा अजेंडा राबवत आहे असा घणाघातभाजपाचेप्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. काँग्रेसने महिला विरोधी चेहरा दाखवून दिलाया याचिकेमुळे काँग्रेसने आपला महिला विरोधी चेहरा पुन्हा एकदा दाखवून दिला आहे, असंही उपाध्ये म्हणाले. उपाध्ये यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की , वडपल्लीवार यांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत 'लाडकी बहीण योजना' बंद करण्याची मागणी केली आहे.

काँग्रेसने यापूर्वीही लाडकी बहिण योजनेविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. मात्र न्यायालयाने याचिका फेटाळून लावली होती . आता पुन्हा एकदा काँग्रेसचा बेगडीपणा उघड झाला आहे.

'महायुती सरकारच्या या योजनेचे महिलावर्गातून स्वागत होत आहे. या योजनेमुळे महिला वर्ग महायुतीच्या बाजून झुकेल तसेच आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसला फटका बसेल या भीतीने काँग्रेस या ना त्या प्रकारे योजनेमध्ये खोडा घालण्याचा प्रयत्न करत आहे', असंही यात म्हटले आहे.

काँग्रेस आणि विरोधकांच्या भुलथापांना सूज्ञ जनता बळी पडणार नाही'राज्यातील माताभगीनी आणि मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य ,स्वावलंबन,पोषण आणि सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरू केली.

कोणत्याही परिस्थितीत ही योजना बंद पडणार नाही हे महायुती सरकारकडून वारंवार स्पष्ट करण्यात येत असूनही काँग्रेसकडून अपप्रचार केला जात आहे. विरोधाला विरोध करायचा या भूमिकेनुसार महिला हिताच्या या योजनेला आडकाठी करण्यात येत असून काँग्रेस आणि विरोधकांच्या भुलथापांना सूज्ञ जनता बळी पडणार नाही असंही उपाध्ये यांनी पत्रकात म्हटले आहे .

# समरजित घाटगेंकडून तुतारीवर शिक्कामोर्तब

**कोल्हापूर** : कोल्हापूर जिल्ह्यातील भाजप नेते आणि माजी ग्रामीण जिल्हाध्यक्ष समरजित घाटगे यांनी भाजपला अधिकृत रामराम केला आहे. त्यांनी आज (२९ ऑगस्ट) सोशल मीडियातून अधिकृत घोषणा करताना शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केलं आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचे संकेत दिले होते. कागलमध्ये घेतलेल्या मेळाव्यात पुन्हा एकदा आपल्याला स्वराज्य निर्माण करायचं आहे आणि त्यासाठी आपण सगळ्यांनी निर्धार केला पाहिजे. कागलच्या हितासाठी जो निर्णय घ्यायला लागेल तो निर्णय घेण्यासाठी तयार असल्याचं सांगत समरजित घाटगे यांनी आगामी विधानसभेला तुतारी फुंकण्यावर शिक्कामोर्तब केलं होतं. समरजित यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्यासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि शरद पवार यांच्या भेटीगाठी झाल्याचेही कार्यकर्त्यांच्या मेळाव्यामध्ये जाहीरपणे सांगितले होते.

दरम्यान, हा निर्णय घेत असताना माझ्या वरिष्ठ नेत्यांशी बोललो असल्याचेही समरजित घाटगे म्हणाले होते. नेत्यांना सांगून करण्यासाठी धमक लागते. प्रेम केलं तर तन-मन-धन करून करायचं. इथून पुढे तुम्हाला त्रास होणार, सरकारी ताकद लावली जाईल, पण हा समरजित तुमच्या पाठीशी असल्याचे ग्वाही कार्यकर्त्यांना दिली होती. सरकारी ताकद केवळ दोन महिने राहणार असल्याचे सांगत अप्रत्यक्षरित्या हसन मुश्रीफ यांना इशारा दिला आहे. माझ्या आणि शरद पवार

दरम्यान समरजित घाटगे पुढे म्हणाले की, २०१९ मध्ये आपली तयारी नव्हती, पण आपण लढलो.




# राष्ट्रवादीच्यावतीने सरकारच्या निषेधार्थ आंदोलन

सातारा : मालवण तालुक्यातील राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळा कोसळला. यामुळे महाराष्ट्राची मोठ्या प्रमाणात बदनामी झाली. या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने सातारा येथील शिवतीर्थावर बुधवारी दुपारी भर पावसात पक्षाच्या वतीने जोरदार निदर्शने व आंदोलन करण्यात आले. यावेळी काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते दीपक पवार, सरचिटणीस राजकुमार पाटील, महिला प्रदेश सदस्य समिंद्रा जाधव, विजय बोबडे, अतुल शिंदे, शिवराज फाळके, प्रताप जगदाळे, इस्माईल मुल्ला, अझर मनेर, नाथाजी बाबर, प्रथमेश पवार, अनिल बडेकर, भानुदास भोसले, सचिन जाधव, सुशांत जाधव, तुषार परीट यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी हातात फलक घेत जोरदार घोषणाबाजी केली.

शिवरायांचा अपमान आम्ही सहन करणार नाही... खोके वाल्यांना पुन्हा सत्तेत येऊ देणार नाही... पुतळा नव्हे स्वाभिमान कोसळला... फक्त समुद्र नव्हे महाराष्ट्र खवळला..., राजे आम्हाला माफ करा पण बेईमान गद्दारांना साफ करा... असे फलक निदर्शकांनी हाती घेतले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात सातारा शहर पोलीस कर्मचारी व काही प्रसारमाध्यमाने रस्त्यावर गर्दी केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्याबद्दल त्यांच्या राजधानीतच घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ महापूर उसळला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे उद्घाघाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. त्याला एक वर्ष पूर्ण होण्याच्या अगोदरच ही दुर्दैवी घटना घडल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.